**रयत शिक्षण संस्थेचे,**

**डी.पी.भोसले कॉलेज,कोरेगाव**

**अर्थशास्त्र विभाग**

**प्रश्न संच**

**बी.ए.भाग III**

# सूक्ष्म अर्थशास्त्र

**प्र.१.योग्य तो पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.**

१) -------- यांच्या मते, अर्थशास्त्र हे संपत्तीचा अभ्यास करणारे शास्त्र आहे.

अ.प्रा.रॉबिन्सन ब.अॅडम स्मिथ क.मार्शल ड.केन्स

२) अर्थशास्त्र हे अर्थशास्त्रातील विविध घटकातील ------- अभ्यासते.

अ.संबंध ब.कार्यकारणभाव क.विविधता ड.मानसिकता

३) अर्थशास्त्रीय नियमांचा -------- करता येतो.

अ.विचार ब. विश्वास क.पडताळा ड. यापैकी नाही

४) वस्तू व सेवांमध्ये ------ असते म्हणून त्याचा उपभोग घेतला जातो.

अ.विनिमयता ब. विभाज्यता क. उत्पादकता ड.उपयोगिता

५) अंशलक्षी अर्थशास्त्र हे ------ घटकांचा अभ्यास करते.

अ. व्यक्तिगत ब.सामाजिक क.बाजार ड. व्यावहारिक

६) ------- यांनी उपयोगिता विश्लेषणाची शास्त्रशुद्ध मांडणी केली.

अ.जे.आर.हिक्स ब. डॉ.मार्शल क. रिकार्डो ड.प्रा.शुंपिटर

७) अर्थशास्त्राची मुलतत्वे हा ग्रंथ ------ यांनी लिहिला.

अ. कार्ल मार्क्स ब. रॉबिन्सन क. डॉ.मार्शल ड.हिक्स

८) उपयोगितेच्या संकल्पनेत ------- स्थान असते.

अ. नैतिकतेला ब. संशोधनाला क. पर्यायी वस्तूंना ड. यापैकी नाही

९) समसीमांत उपयोगिता सिद्धांत ------- यांनी मांडला.

अ. डॉ.मार्शल ब. कार्ल मार्क्स क. रॉबिन्सन ड. रिकार्डो

१०) उपभोक्त्याचे लाभाधिक्य ही मूळ संकल्पना ------- यांनी मांडली.

अ. डूप्यूट ब. रिकार्डो क. रॉबर्टसन ड. प्रा.पिगु

११) उपयोगिता मोजण्यासाठी ------- या साधनाचा वापर केला जातो.

अ.पैसा ब. सोने क. धान्य ड. यापैकी नाही

१२) उपभोक्त्याचे लाभाधिक्याची संकल्पना -------- लागू होत नाही.

अ.चैनीच्या वस्तू ब. उत्पादकांच्या वस्तू क. नैसर्गिक वस्तू ड.उपभोग्य वस्तू

१३) मक्तेदाराला वस्तूची किमत निश्चित करताना ------ ही संकल्पना उपयोगी पडते.

अ. उपयोगिता ब. उपभोक्त्याचे लाभाधिक्य क.कर ड. वरील सर्व

१४)प्रा. -------- यांच्या मते,श्रमिकांच्या व यंत्रसामग्रीच्या विशेषीकरणाने वाढते फल प्राप्त होते.

अ.चेबरलीन ब. रॉबिन्सन क. रिकार्डो ड. केन्स

१५) काही उत्पादक घटक ------- असतात.

अ. विभाज्य ब. अविभाज्य क. मर्यादित ड. अमर्याद

१६) ------- ज्ञानानुसार उत्पादन फलन बदलते.

अ. भौतिक ब. अभौतिक क. तांत्रिक ड. आधुनिक

१७) कोणताही उत्पादनविषयक निर्णय घेताना ------ उत्पादनाला विशेष महत्व आहे.

अ.एकुण ब. सरासरी क.व्यावसायिक ड. सीमांत

१८) बदलत्या प्रमाणाच्या नियमांने ------- लवचिकतेची कल्पना येते.

अ. पुरवठ्याच्या ब. मागणीच्या क. ताठर ड. व्यावसायिक

१९) डॉ. -------- यांनी अंतर्गत फायदे व बहिर्गत फायदे असे वर्गीकरण केले.

अ.मार्शल ब. सॅम्युलसन क.बेनहॅम ड. जोन रॉबिन्सन

२०) मोठ्या उत्पादन संस्थाना संशोधनासाठी -------- उभारणे शक्य होते.

अ. सयंत्र ब. प्रयोगशाळा क. व्यवस्थापन ड. भांडवल

२१) हे ------ फायदे सर्वच उत्पादन संस्थाना प्राप्त होतात.

अ. अंतर्गत ब. विशेष क. बाहय ड. व्यावसायिक

२२) एकाच प्रकारचे उद्योग एकत्रित आल्याने ------ पुरवठा कमी पडतो.

अ. भांडवलाचा ब. जमिनीचा क. संयोजकाचा ड. मजुरांचा

२३) प्राप्तीचा अभ्यास करताना प्राप्तीच्या एकुण -------- संकल्पना महत्वपूर्ण मानल्या जातात.

अ.दोन ब. तीन क.चार ड. पाच

२४) ------ प्राप्ती ही एकुण प्राप्तीमध्ये झालेली निव्वळ वाढ असते.

अ. सरासरी प्राप्ती ब. एकुण प्राप्ती क. सीमांत प्राप्ती ड. यापैकी नाही

२५) ------- बाजारात सरासरी प्राप्ती व सीमांत प्राप्ती समान असतात.

अ. मक्तेदारी ब. पूर्ण स्पर्धा क. अपूर्ण स्पर्धा ड. मक्तेदारीयुक्त स्पर्धा

२६) सरासरी प्राप्ती वक्राला ------ वक्र असेही म्हणतात.

अ. सरासरी खर्च ब. सीमांत खर्च क. मागणी वक्र ड. पुरवठा वक्र

२७) किमंत निश्चितीमध्ये ------ प्राप्ती वक्राला महत्व नसते.

अ. सरासरी प्राप्ती ब. एकुण प्राप्ती क. सीमांत प्राप्ती ड. यापैकी नाही

२८) अर्थशास्त्रात वास्तव खर्चाची संकल्पना --------- यांनी मांडली.

अ. रिकार्डो ब. केन्स क. माल्थस ड. मार्शल

२९) ------- यांच्या अर्थशास्त्राच्या व्याख्येबरोबर संधी खर्चाची संकल्पना आधारित आहे.

अ. रॉबिन्सन ब. ॲडम स्मिथ क. डॉ.मार्शल ड. रिकार्डो

३०) अल्पकाळातील ------ खर्च वक्र इग्रजी यु आकाराचा असतो.

अ. सरासरी स्थिर खर्च ब. सरासरी बदलता खर्च क. सरासरी खर्च ड. सीमांत खर्च

३१) खालीलपैकी -------- हा खर्च सामाजिक खर्च आहे.

अ. इंधन ब.कच्च्या मालावरील क. प्रदूषण नियंत्रण ड. जाहिरात खर्च

३२) ------- खर्च संकल्पना आर्थिकदृष्ट्या अधिक महत्वाची आहे.

अ. पैशातील ब. वास्तव क. संधी ड. खाजगी

**प्र २.दीर्घोतरी प्रश्न लिहा.**

१) अर्थशास्त्र म्हणजे काय? अर्थशास्त्राचे स्वरूप व व्याप्ती स्पष्ट करा.

२) अंशलक्षी अर्थशास्त्राचा अर्थ सांगून त्याचे महत्व व मर्यादा सांगा.

३) समग्रलक्षी अर्थशास्त्र म्हणजे काय? त्याचे गुण-दोष स्पष्ट करा.

४) अंशलक्षी अर्थशास्त्र व समग्रलक्षी अर्थशास्त्र यांतील फरक स्पष्ट करून सांगा.

५) आर्थिक विश्लेषणातील मुलभूत गृहीते विशद करा.

६) घटत्या सीमांत उपयोगितेचा नियम स्पष्ट करा.

७) समसीमांत उपयोगिता सिद्धांताची चर्चा करा.

८) अंकवाचक उपयोगिता विश्लेषणातील प्रमुख दोष सांगा.

९) उपभोक्त्याचे लाभाधिक्य ही संकल्पना सविस्तरपणे स्पष्ट करा.

१०) उपभोक्त्याचे संतोषाधिक्य या संकल्पनेवरील प्रमुख टीकेचे वर्णन करा.

११) उपभोक्त्याचे संतोषाधिक्य या संकल्पनेचे महत्व विशद करा.

१२) उत्पादन प्रमाण फलाच्या सिद्धांताची चर्चा करा.

१३) बदलत्या प्रमाणाच्या नियमांची सविस्तर चर्चा करा.

१४) बदलत्या प्रमाणाचा सिद्धांत स्पष्ट करा.

१५) मक्तेदारीतील सरासरी प्राप्ती वक्राचे सविस्तर विश्लेषण करा.

१६) पूर्ण स्पर्धेतील उद्योगसंस्थेच्या सरासरी, सीमांत व एकूण प्राप्ती वक्राचे सविस्तर विश्लेषण करा.

१७) अल्पकालीन खर्चाचे सविस्तर विश्लेषण करा.

१८) दीर्घकालीन खर्चाचे आकृतीद्वारे विश्लेषण करा.

**प्र.३. थोडक्यात उत्तरे द्या.**

१) अर्थशास्त्राची व्याप्ती विशद करा.

२) अंशलक्षी अर्थशास्त्राचे गुण-दोष स्पष्ट करा.

३) घटत्या सीमांत उपयोगिता सिद्धांताचे अपवाद सांगा.

४) घटत्या सीमांत उपयोगिता नियम कोणकोणत्या क्षेत्रात उपयुक्त ठरतो ते स्पष्ट करा.

५) समसीमांत उपयोगिता सिद्धांताच्या मर्यादा स्पष्ट करा.

६) समसीमांत उपयोगिता सिद्धांताचे महत्व विशद करा.

७) अंकदर्शी उपयोगिता विश्लेषणातील त्रुटी कोणत्या?

८) उपभोक्त्याचे लाभाधिक्य हे तत्व स्पष्ट करा.

९) उपभोक्त्याचे लाभाधिक्य विश्लेषणातील गुहिते सांगा.

१०) उपभोक्त्याचे संतोषाधिक्य या तत्वाचे महत्व सांगा.

११) उत्पादन प्रमाण फलाच्या नियमांची चर्चा करा.

१२) बदलत्या प्रमाणाच्या नियमांचे आकृतीसह स्पष्टीकरण करा.

१३) बदलत्या प्रमाणाच्या नियमांच्या विविध टप्प्याचे वर्णन करा.

१४) बदलत्या प्रमाणाच्या नियमांच्या मर्यादा व महत्व स्पष्ट करा.

१५) एकूण प्राप्ती, सरासरी प्राप्ती व एकूण प्राप्ती या संकल्पनांचे विश्लेषण करा.

१६) सरासरी खर्च व सीमांत खर्च यामधील संबंध स्पष्ट करा.

१७) संधी खर्चाची संकल्पना सविस्तर स्पष्ट करा.

१८) बदलता खर्च व स्थिर खर्च यांचे विश्लेषण करा.

**रयत शिक्षण संस्थेचे,**

# डी कोरेगाव,भोसले कॉलेज .पी.

## अर्थशास्त्र विभाग

## प्रश्न संच

## बीIII भाग.ए. (सेमी-.V)

## विकासाचे अर्थशास्त्र

**प्र.१.योग्य तो पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.**

१) आर्थिक विकासाचा प्रभाव समाजाच्या सर्वच ----------- पडत असतो.

अ. अंगावर ब. क्रियावर क. प्रश्नावर ड. व्यवहारावर

२) ------- यांच्या मते ज्यामुळे दीर्घकाळात देशाचे वास्तव दरडोई उत्पन्न वाढते अशी प्रक्रिया म्हणजे आर्थिक विकास होय.

अ. प्रा.मायर ब. एच. एम. हाम क.प्रा.रॉबर्टसन ड. प्रा. लेविस

३) चांगल्या जीवनाचे --------- हे पैलु होत.

अ. जीवन पोषण ब. स्वयं- प्रशंसा क. स्वांत्रत्र्य ड. वरील सर्व

४) ------- हे आर्थिक विकासाचे वैशिष्ट्य आहे.

अ. तांत्रिक प्रगती ब. जीवनमानाच्या दर्जात सुधारणा क. दीर्घकालीन प्रक्रिया ड. वरील सर्व

५) आर्थिक विकास व वृद्धी यामधील फरक ------ अर्थशास्त्रज्ञाने स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला.

अ. प्रा.शुपिटर ब. मिसेस उर्सुला हिक्स क. जे.के. मेहता ड. वरील सर्व

६) ------- यांनी आर्थिक विकास व वृद्धी यांचा संबध उपन्न पातळीतील वाढीशी जोडला आहे.

अ. श्री.ए. मॅडिसन ब. किंडलबर्जर क. मिसेस उर्सुला हिक्स ड. प्रा. रोस्टो

७) एकूण राष्टीय उत्पन्नातील वाढ म्हणजे --------- होय.

अ. आर्थिक वृद्धी ब. आर्थिक विकास क. विकसित अर्थव्यवस्था ड. अ विकसित अर्थव्यवस्था

८) आर्थिक विकासाचा विचार --------- राष्टांच्या संदर्भात केला जातो.

अ. अल्पविकसित ब. विकसित क. मागासलेल्या ड. वरील सर्व

९) --------- यांना सन १९७१ मधील अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक मिळाले.

अ. प्रा.मायर ब. प्रा.जे.के. मेहता क. प्रा कुझनेटस ड. यापैकी नाही

१०) आर्थिक विकासाचा दर्शक म्हणून दरडोई उत्पन्न वाढीला महत्वाचे स्थान दिले.

अ. प्रा.मायर ब. किंडलबर्जर क. जे.के. मेहता ड. प्रा.रॉबर्टसन

११) आर्थिक विकासाचे मापन करण्यासाठी -------- यांनी निर्देशांकाची मोठी यादी तयार केली.

अ. प्रा.हॅजेन   ब. सॅम्यूअलसन   क. प्रा. हिक्स   ड. जेकब वायनर

१२) दारिद्र्य दुष्ट्चक्राची संकल्पना ------ यांनी मांडली.

अ. किंडलबर्जर ब. प्रा. नर्क्स क. रोडान  ड. मार्शल

१३) -------- यांच्या मते, अविकसित देशातील श्रमिकांची सीमांत उत्पादकता शून्य असते.

अ. प्रा. नर्क्स ब. किंडलबर्जर क. रथ आणि दांडेकर  ड. मिर्डाल

१४) ----------- यामुळे व्यक्तीची व्यावसायिक गतिशीलता कमी होते.

अ. जातीव्यवस्था  ब. शिक्षण  क. संघटन व्यवस्था  ड. वरील सर्व

१५) --------- विकास संकल्पनेत भविष्यकालीन गरजांचाही विचार केला जातो.

अ. शाश्वत  ब. हरित   क. स्थूल     ड. सक्तीचा

१६) ---------- हा शाश्वत विकासाचा दर्शक होय.

अ. स्थूल देशांतर्गत उत्पादन  ब. पाणीपुरवठा  क. मानवी सामग्री निर्देशांक ड. वरील सर्व

१७) हरित विकास ही --------- च्या वापरा संबधीची संकल्पना आहे.

अ. भूमी   ब. मानव   क. भांडवल   ड.  वरीलपैकी नाही

१८) ---------- हे स्थलांतराचे प्रमुख कारण होय.

अ. मोठी धरणे  ब. खाणीची उभारणी  क. विद्युतनिर्मिती प्रकल्प  ड. वरील सर्व

१९) भारतात सेझची स्थापना ------- मध्ये झाली.

अ. १९११   ब. २००५    क. २०१०    ड. २०१५

२०) --------- यांनी विकसनशील अर्थव्यवस्थेची आधिक व्यापक व्याख्या केली आहे.

अ. प्रा. जेकब वायनर  ब. प्रा. हिक्स   क. प्रा.मेहता  ड. प्रा.मायर व बाल्डविन

२१) ---------- यांनी अविकसित राष्ट्राचे वर्णन केले आहे.

अ.पॉल इॅफसन  ब. डॉ.मार्शल    क. रिकार्डो   ड. हाम

२२) अविकसित राष्ट्रात प्रमुख व्यवसाय -------- हा असतो.

अ. लघु उद्योग ब. शेती    क. वाहतूक    ड. खाणकाम

२३) सार्वत्रिक दारिद्र्य हे --------- देशाचे लक्षण होय.

अ. प्रगत  ब. अप्रगत    क. विकसनशील  ड. वरीलपैकी नाही

२४) प्रगत देशात -------- अर्थव्यवस्था असते.

अ. व्दिमुखी   ब. विकसित     क. साम्यवादी   ड. मिश्र

२५) --------- यांनी आधुनिक आर्थिक वृद्धीच्या लक्षणाची चर्चा केली आहे.

अ. मायर   ब. बाल्डविन क. कुझनेट्स  ड. सोलो

२६) -------- हे आधुनिक वृद्धीचे लक्षण होय.

अ. उत्पादकतेत वाढ  ब. रचनात्मक परिवर्तनाचा उच्च दर   क. शहरीकरण ड. वरील सर्व

२७) लोकसंख्येतील वृद्धी हे आधुनिक आर्थिक वृद्धीचे ------- लक्षण होय.

अ. संख्यात्मक  ब. गुणात्मक  क. रचनात्मक ड. वरीलपैकी नाही

२८) ------- देशात आर्थिक वृद्धीचा दर जास्त होता.

अ.इंग्लड    ब. जर्मनी   क. अमेरिका   ड. वरील सर्व

२९)-------- अर्थव्यवस्थेसाठी आर्थिक वृद्धी ही संकल्पना वापरली जाते.

अ. अविकसित   ब. अल्पविकसित    क. मागासलेल्या    ड. विकसित

३०) ------ या घटकाची कमतरता हा आर्थिक वृद्धीला अडथळा ठरतो.

अ. भांडवल  ब. संघटन    क. तांत्रिक प्रगती   ड. वरील सर्व

३१) रोस्टो यांनी अवस्था वाढीचा सिद्धांत ------ मध्ये प्रसिद्ध केला.

अ. १९४७  ब. १९५१   क. १९६०   ड. १९७०

३२) रोस्टो यांनी आर्थिक वृद्धीच्या ---------  अवस्था मानल्या आहेत.

अ. तीन    ब. चार  क. पाच    ड. सहा

३३) -------- अवस्थेत विकास मार्गातील जवळ जवळ सर्व अडथळे दूर होतात.

अ.उड्डाण पूर्व  ब. उड्डाणावस्था  क. परिपक्व्तेकडे वाटचाल ड. उच्च बहुजन उपभोग गुण

३४) प्रा.आर्थर लेविस यांनी ------- मध्ये अमर्याद श्रम पुरवठ्याद्वारे आर्थिक विकास सिद्धांत मांडला.

अ. सन १९४१  ब. सन १९५४ क. सन १९६० ड. सन १९६६

३५) प्रा.लेविस यांच्या मते, अविकसित देशात --------- अर्थव्यवस्था असते.

अ. कृषिप्रधान  ब. व्दिक्षेत्री  क. मिश्र  ड. भांडवलशाही

३६) -------- यांच्या मते, सर्वच अविकसित देशात श्रम पुरवठा अतिरिक्त असतो.

अ. प्रा.लेविस   ब. प्रा. टोरेटो क. रोडान  ड. प्रा. हिक्स

३७) रोडानने मोठा धक्का सिद्धांत ------- मध्ये मांडला.

अ. १९४०    ब. १९४३    क. १९४५    ड. १९५०

३८) रोडनने ------- अविभाज्यतेची चर्चा केली आहे.

अ. उत्पादन फलनातील अविभाज्यता ब. मागणीची अविभाज्यता क. बचतीच्या पुरवठ्या तील अविभाज्यता ड. वरील सर्व

३९) रोडानने आंतरराष्ट्रीय व्यापाराकडे दुर्लक्ष केल्याची टीका ------- यांनी केली.

अ. प्रा.जेकब वायनर  ब. प्रा. जे.आर. हिक्स  क. रॅग्नर नर्क्स ड. किंडलबर्जर

४०)  मिर्डाल यांना -------- या ग्रंथाने प्रसिद्धी मिळवून दिली.

अ. एशियन ड्रामा ब. दास कॅपिटल  क. वेल्थ ऑफ नेशन्स  ड. जनरल थिअरी

४१) आंतरराष्ट्रीय आर्थिक विषमतेची चर्चा -------- या विकास सिद्धांतात केली आहे.

अ. मिर्डालचा आर्थिक विकास ब. रिकार्डोचा खंड सिद्धांत क. माल्थसचा लोकसंख्या सिद्धांत ड. अॅडम स्मिथच्या घटत्या सीमांत उपयोगिता

४२) नवीकरणक्षम साधन संपत्तीत ------- चा समावेश होतो.

अ. जमीन ब. पाणी क. वायू  ड. वरील सर्व

४३) अनवीकरण साधनात -------- चा समावेश होतो.

अ. लोखंड  ब. खनिज तेल  क. सोने   ड. वरील सर्व

४४) जमिनीचा प्रमुख प्रकार म्हणजे ------- होय.

अ. गाळाची जमीन   ब.  काळी जमीन  क. तांबडी  ड. वरील सर्व

४५) --------  वापर करून अविकसित देशातील भांडवल निर्मितीची समस्या सोडविता येतो.

अ. उत्पन्नाचा  ब. उपभोगाचा  क. बचतीचा   ड. व्यापाराचा

४६) -------- हे एक वित्तीय धोरणाचे प्रमुख आणि परिणामकारक साधन आहे.

अ. तुटीचा अर्थभरणा  ब. सार्वजनिक खर्च  क. जकात  ड. कर

४७) अविकसित देशात वाढती --------- भांडवल निर्मितीचा दर कमी करते.

अ. उपभोक्ता  ब. लोकसंख्या क. श्रमसंख्या ड. बेकारी

४८) ------- यांनी मानवी भांडवलाच्या विकासाचे मार्ग सांगितले आहेत.

अ. प्रा. शुल्झ  ब. मायर   क. किंडलबर्जर ड. मार्शल

४९) श्रमिकांचे उत्पादन सामर्थ्य वाढविण्यासाठी ------- अपेक्षित असते.

अ. उत्पादनाचा दर्जा उंचावणे ब. मानवी भांडवलातील गुंतवणूक क. शेतीचा विकास ड. वरील सर्व

५०) ------- हे संस्थाचे प्रमुख लक्षण होय.

अ. विशिष्ट वृत्ती दर्शविणे ब. चिरकाल टिकणारी क. एकसंध रचना ड. वरील सर्व

५१) ---------- यांच्या मते, आर्थिक विकासासाठी लोकांच्या वृत्तीत बदल घडून आला पाहिजे.

अ.जातीसंस्था ब. एकत्र कुटुंबपद्धती क. धार्मिक तत्वज्ञान ड. वरील सर्व

५२) -------- यांच्या मते,आर्थिक विकासाठी लोकांच्या वृतीत बदल घडून आला पाहिजे.

अ.प्रा.रोस्टो    ब. मायर आणि बाल्डविन क. प्रा. नर्क्स ड. प्रा.बेलशॉं

५३) केवळ ------- बदलातून आर्थिक परिवर्तन घडून येत नाही.

अ. संस्थात्मक  ब. संख्यात्मक  क. गुणात्मक ड. दर्जात्मक

५४) मिर्डाल यांनी -------- हा ग्रंथ लिहिला.

अ. आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र  ब. सार्वजनिक आयव्यय क. संपत्तीचे अर्थशास्त्र ड. अर्थशास्त्राची मुलतत्वे

प्र. २. दीर्घोत्तरी प्रश्न

१) आर्थिक विकासाची संकल्पना सांगून आर्थिक विकासाची वेशिष्टे स्पष्ट करा.

२) आर्थिक विकास म्हणजे काय हे प्रा. मायर यांच्या व्याख्येच्या आधारे स्पष्ट करा.

३) आर्थिक विकास म्हणजे काय? आर्थिक विकास व आर्थिक वाढ यातील फरक स्पष्ट करा.

४) आर्थिक विकास म्हणजे काय? हे सांगून आर्थिक विकासाच्या प्रमुख वेशिष्टे स्पष्ट करा.

५) आर्थिक विकासाचे गुणात्मक निर्देशांक कोणते? त्यांच्या मर्यादा सांगा.

६) आर्थिक विकासातील निर्देशक घटक कोणते? त्यातील अडचणी सांगा.

७) अविकसित अर्थव्यवस्थेच्या विकास मार्गातील प्रमुख अडथळे कोणते?

८)शाश्वत विकास म्हणजे काय?  त्याचे दर्शक कोणते?

९) हरित विकासाचा अर्थ सांगून त्यामध्ये कोणत्या बाबीचा समावेश होतो ते स्पष्ट करा.

१०) स्थलांतर म्हणजे काय हे सांगून स्थलांतराची कारणे स्पष्ट करा.

११) भारतातील स्थलांतराचे स्वरूप व व्याप्ती स्पष्ट करा.

१२) अविकसित अर्थव्यवस्थेची संकल्पना स्पष्ट करा.

१३) अल्प विकसित अर्थव्यवस्थेची व्याख्या देऊन लक्षणे स्पष्ट करा.

१४) अविकसित देशांच्या वैशिष्याची चर्चा करा.

१५) आधुनिक अर्थव्यवस्थेची मुलभूत वैशिष्ये स्पष्ट करा.

१६) आर्थिक वृद्धीत अडथळे निर्माण करणाऱ्या आर्थिक घटकांचा आढावा घ्या.

१७) प्रा.रोस्टो च्या आर्थिक प्रगतीच्या टप्प्याचे वर्णन करा.

१८) प्रा.रोस्टो च्या आर्थिक प्रगतीच्या टप्प्याचे टीकात्मक मूल्यमापन करा.

१९) प्रा. लेविसच्या अमर्यादित श्रम पुरवठ्याच्या सहाय्याने विकास करता येतो हे स्पष्ट करा.

२०) प्रो. रोडानच्या मोठा धक्का सिद्धांताची चर्चा करा.

२१) प्रबळ चालनेचा सिद्धांत स्पष्ट करा.

२२) प्रो. मिर्डाल यांच्या विकासाच्या सिद्धांताची चर्चा करा.

२३) देशाच्या विकास प्रक्रीयेतील नैसर्गिक साधनसंपत्तीचे सापेक्ष महत्व  स्पष्ट करा.

२४) नवीकरणक्षम साधनसंपत्ती म्हणजे काय? भारतातील नवीकरणक्षम साधनसंपत्तीचा आढावा घ्या.

२५) अनवीकरणक्षम संसाधने म्हणजे काय? भारतातील या साधनसंपत्तीचा आढावा घ्या.

२६) भांडवल निर्मित्तीचा अर्थ सांगून तिचे आर्थिक विकासातील स्थान स्पष्ट करा.

२७) भांडवल निर्मित्तीच्या विविध स्रोताची चर्चा करा.

२८) मानवी भांडवल निर्मिती म्हणजे काय? त्यांचा विकास कसा घडून येतो.

२९) मानवी भांडवल निर्मिती आणि आर्थिक विकास यांचा सहसंबध स्पष्ट करा.

३०) आर्थिक विकासातील विभिन्न संस्थाचा कार्यभाग स्पष्ट करा.

३१) आर्थिक वृद्धी निर्धारित करणाऱ्या घटकावरील संस्थात्मक प्रभाव स्पष्ट करा.

३२) आर्थिक विकासात शासनाची भूमिका स्पष्ट करा.

प्र.३ टीपा लिहा.

१) आर्थिक विकासाची व्याख्या

२) आर्थिक विकासाची वैशिष्ये

३) आर्थिक विकास व आर्थिक वाढ यातील फरक

४) आर्थिक विकासाचे मोजमाप

५) सामाजिक निर्देशांकाची पद्धत

६) विकास मार्गातील प्रमुख अडथळे

७)शाश्वत विकास

८) हरित विकास

९) शाश्वत विकासाचे महत्व

१०) स्थलांतराचा अर्थ

११) स्थलांतराची कारणे

१२) अविकसित अर्थव्यवस्थेची संकल्पना

१३) विकसनशील अर्थव्यवस्था

१४) वस्तूंचा प्रवाह

१५) भांडवलाचा प्रवाह

१६) आर्थिक घटक

१७) बिगर आर्थिक घटक

१८) प्रोरोस्टोच्या आर्थिक विकासाच्या अवस्था .

१९) उड्डाणावस्था

२०) उड्डाणपूर्व अवस्था

२१) भांडवल संचयात शासन व खाजगी भांडवलदाराचे कार्य

२२) बँक पतनिर्मितीतून भांडवल संचय

२३)विसासाच्या मार्गातील अडथळे व त्यावरील उपाय

२४) अविकसित देश्यातील द्विक्षेत्री अर्थव्यवस्था

२५) उत्पादन फलनातील अविभाज्याता

२६) मागणीची अविभाज्याता

२७) बचतीच्या पुरवठ्यातील अविभाज्याता

२८) प्रतिसारक परिणाम

२९) विस्तारक परिणाम

**रयत शिक्षण संस्थेचे,**

# डी.पी. भोसले कॉलेज,कोरेगाव

## अर्थशास्त्र विभाग

## प्रश्न संच

## बी.ए.भाग - III सेमी.- V

## आर्थिक विचारांचा इतिहास

प्र. १ योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.

१) ------- ने श्रमविभागणीचा संबंध मानवाच्या विनिमय करण्याच्या नैसर्गिक प्रवृत्तीशी जोडला आहे.

अ) स्मिथ ब) रिकार्डो क) लॉर्ड केन्स ड) डॉ. क्वेस्ने

२) स्मिथच्या मते, ------------ उत्पादनात प्रचंड वाढ होते.

अ) यंत्राने ब) श्रमविभागणीने क) भांडवलाने ड) व्यवस्थापनाने

३) स्मिथने आपल्या मूल्यसिद्धांतात ------------- महत्व दिले.

अ) पैशाला ब) उपभोगाला क) श्रमाला ड) विनिमयाला

४) स्मिथने महत्वाच्या ------------ करकसोट्या सांगितल्या आहेत.

अ) २ ब) ३ क) ५ ड) ४

५) स्मिथचा मूल्य सिद्धांत------------- स्पर्धेच्या बाजारपेठेत खरा ठरतो.

अ) पूर्ण ब) मक्तेदारी क) विभक्त मक्तेदारी ड) मक्तेदारीयुक्त

६) रिकार्डोने उपयोगिता मूल्य व विनिमय मूल्य या दोहोंमधील --------- स्पष्ट केला.

अ.फरक ब) समानता क) विषमता ड) साम्य

७)रिकार्डोच्या मते, यंत्रे व अवजारे या वस्तू म्हणजे भूतकाळातील ---------- श्रमच होत.

अ.खर्चीलेले ब) साठविलेले क) शिल्लक ड) उपयुक्त

८)जमीन, मजूर, भांडवल हे उत्पादनाचे तीन घटक -------- ने मानले.

अ.स्मिथ ब) माल्थस क) रिकार्डो ड) हँने

९)सिडने व वेब हे अर्थशास्त्रज्ञ रिकार्डोच्या खंडविषयक सिद्धांताला सामुदायिक अर्थव्यवस्थेची --------- समजतात.

अ. पाया ब) शिखर क) आधार ड) कोनशीला

१०)रिकार्डोचा निर्वाह वेतन सिद्धांत ----------- लोकसंखेच्या सिद्धांत वर आधारलेला असतो .

अ. माल्थस ब) स्मिथ क) कार्ल मार्क्स ड)फ्रेडरिक लिस्ट

११)रिकार्डोने ----------- समावेश नफ्यात केला.

अ.खंडाचा ब) व्याजाचा क) वेतनाचा ड) या सर्वांचा

१२)लोकसंख्येची वाढ --------- म्हणजे १,२,४,८, १६, ३२,याप्रमाणे होते.

अ. भूमितीश्रेणीने ब) गणितीश्रेणीने क.संख्या श्रेणीने ड.बेरजेने

१३)माल्थसने आपला लोकसंख्याविषयक निबंध सन ----- मध्ये प्रसिद्ध केला.

अ.१६९८ ब.१७९८ क.१८९८ ड. यापैकी नाही

१४) माल्थसच्या लोकसंख्याचा सिद्धांत शेती व्यवसायातील ------- गृहितावर आधारित आहे.

अ.वाढत्या फलाच्या ब. स्थिर फलाच्या क.घटत्या फलाच्या ड.पूर्ण स्पर्धेच्या

१५)रिकार्डोने ------ च्या सिद्धांताचे जोरदार समर्थन केले.

अ.स्मिथ ब. माल्थस क.केन्स ड.से

१६) माल्थसच्या मते, सरकारने ------ बांधकामावर मोठ्या प्रमाणात पैसा खर्च केला पाहिजे.

अ. सार्वजनिक ब.खाजगी क.मोठ्या ड.सार्वत्रिक

१७) ------- विचारसरणीचा प्रमुख प्रणेता फ्रेडरिक लिस्ट होता.

अ.राष्टवादी ब.मुक्त क. परराष्ट्रीय ड.खुल्या व्यापारी

१८)लिस्टने सनातनवाद्याच्या ------- भूमिकेवर कठोर टीका केली.

अ. राष्टवादी ब.व्यक्तिवादी क. उपभोगवादी ड. उपयोगीतावादी

१९) लिस्टच्या मते प्रत्येक देशाला आर्थिक विकासाच्या निरनिराळया ------- मधून जावे लागते.

अ.स्थित्यंतरां ब. घटकां क.अवस्था ड. विचारां

२०) व्युक्तिवाद व विश्वावाद या दोहोंमधील भूमिका म्हणजे ------ होय.

अ.वैश्विक ब. व्यक्तिवाद क.संघर्ष ड. राष्टवाद

२१) स्मिथच्या खुल्या व्यापाराला विरोध करण्यासाठी लिस्टने प्रथम ------ तत्वज्ञानाचा पुरस्कार केला.

अ.संरक्षणविषयक ब. राष्टवादी क. विश्ववादी ड.आर्थिक विकास

२२) लिस्टच्या संरक्षणनीती धोरणाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याने ------- व्यवसायाला संरक्षण देऊ नये असे प्रतिपादन केले होते.

अ.उद्योग ब.शेती क.लघु उद्योग ड.मक्तेदारी

२३)लिस्ट हा संरक्षणाचे धोरण हे --------विकास घडून आणण्याचे साधन समजत होता.

अ.राष्टीय ब. शेती क.आर्थिक ड.औद्योगिक

२४)कोणत्याही समाजाचा विकास मार्क्सच्या मते ------- होतो.

अ.विरोधातून ब. संघर्ष क. विषमतेतून ड. विभाजनातून

२५) भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील निर्माण होणाऱ्या-------- उत्पादनाने व तेजी-मंदी चक्राने विनाशकाल लवकर घडून येतो.

अ. अल्प ब. अति क.समान ड.विषम

२६) आर्थिक-------- अनेक प्रश्न सोडविता येत असल्याने मार्क्सचा सिद्धांत पटत नाही.

अ.विकासाने ब.समानतेने क.नियोजनाने ड.विषमतेने

२७)वस्तूचे मूल्य हे वस्तूमध्ये समाविष्ट झालेल्या ------- वरुन ठरते.

अ.गुणा ब.दोषा क. उत्पादन ड.श्रमा

२८)सामाजिकदृष्ट्या योग्य व आवश्यक असणाऱ्या श्रमाच्या संदर्भात------ मूल्याचा विचार करावा लागतो.

अ. विनिमय ब. उपयोगिता क. उपभोग ड.व्यापार

२९) मार्क्सच्या मूल्य सिद्धांतात ------ बाजूकडे दुर्लक्ष केलेले आहे.

अ. उपभोगाच्या ब. उपयोगितेच्या क.उत्पादनाच्या ड.श्रमाच्या

३०)कामगारांनी निर्माण केलेल्या वस्तूचे बाजारातील मूल्य व कामगाराला श्रमाचे मूल्य म्हणून दिले जाणारे वेतन यातील तफावत म्हणजे ------ मूल्य होय.

अ.बाजार ब.विनिमय क.अतिरिक्त ड.वाढावा

३१)निरपेक्ष अतिरिक्त मूल्य म्हणजे कामगाराच्या ------- तास वाढवून निर्माण होणारे मूल्य होय.

अ. श्रमाचे ब. उत्पादनाचे क.विश्रांतीचे ड.कामाचे

३२) मार्क्सच्या मते, भांडवलशाहीचा जसा विकास होत जातो तसा ------ दरात घट होत जाण्याची प्रवृत्ती असते.

अ. नफ्याच्या ब. श्रमाच्या क.वेतनाच्या ड.भांडवलाच्या

३३)--------- हे आर्थिक विकासाचे मुख्य गमक असते.

अ. श्रमवृद्धी ब.उत्पादनवृद्धी क.उपभोगवृद्धी ड.भांडवलवृद्धी

३४)जर्मन अर्थशास्त्रज्ञ -------- च्या मते व्यापारवाद म्हणजे राष्टनिर्मिती होय.

अ. स्मॉलर ब. प्रो.हने क.स्मिथ ड.नेमॉर्स

३५)थॉमास मनच्या मते, संपत्तीचा साठा वाढविण्याचा मार्ग म्हणजे------ व्यापार होय.

अ. अंतर्गत ब. परराष्ट्रीय क.शेती ड. यापैकी नाही

३६)निसर्गवाद्याच्या मते ------- हाच एक उत्पादक व्यवसाय आहे.

अ.उद्योग ब.व्यापार क. शेती ड. लघु उद्योग

३७)निसर्गाच्या औदार्याने वाढाव्याची निर्मिती होणे म्हणजे ------ होय.

अ.उपभोग ब.व्यवहार क. उद्योग ड.उत्पादन

३८)------ संचलनाचा सिद्धांत निसर्गवादी अर्थशास्त्राचा गाभा आहे.

अ.संपत्ती ब. पैसा क. सत्ता ड. शेती

३९)राष्ट्राची ------- एकता ही कल्पना व्यापारवादयांनी प्रथम यशस्वीपणे मांडली.

अ.राजकीय ब.आर्थिक क. सार्वभौम ड.सर्वांगीण

४०)परराष्टीय व्यापार हे ------ धातू प्राप्त करुन देण्याचे एकमेव साधन आहे.

अ. पैसा ब. भौतिक क.मौल्यवान ड. विशेष

४१) व्यापारवाद्यानी -------- राजसत्तेचे समर्थन केले.

अ. सार्वभौम ब.लोकशाही क.नियंत्रित ड.अनियंत्रित

४२) बंधनविरहीत ------ व्यवस्था हे निसर्गवादाचे प्रमुख सूत्र आहे.

अ.नैसर्गिक ब.अनैसर्गिक क.शेती ड. व्यापार

४३) शेतीत प्रत्यक्ष काम करणाऱ्या वर्गाचा समावेश ----- वर्गात होतो.

अ. अनुत्पादक ब. उत्पादक क. उपभोक्ता ड. वरील सर्व

प्र.२ दिर्घोतरी प्रश्न लिहा.

१) व्यापारवादी विचारांचे मूल्यमापन करा.

२) निसर्गवादाचा उदय व निसर्गव्यवस्थेची विचारसरणी स्पष्ट करा.

३) ॲडम स्मिथचा निसर्गवाद व आशावाद स्पष्ट करा.

४) ॲडम स्मिथच्या मूल्य सिद्धांताची परीक्षण करा.

५) ॲडम स्मिथच्या विभाजनविषयक सिद्धांताची चर्चा करा.

६) ॲडम स्मिथचे श्रमविभागणीचे विचार स्पष्ट करा.

७) ॲडम स्मिथचे उदारमतवादाबाबतचे आर्थिक विचार स्पष्ट करा.

८) ॲडम स्मिथच्या मूल्य व विभाजनविषयक विचारांचे परीक्षण करा.

९) आर्थिक उदारमतवाद आणि आंतरराष्ट्रीय व्यापार याबाबतीत स्मिथची मते विशद करा.

१०)ॲडम स्मिथचे भांडवल,राज्याची कार्ये व सार्वजनिक आयव्यय यासंबंधीच्या मताचे परीक्षण करा.

११)डेव्हिड रिकार्डोच्या मूल्यविषयक विचारांचे स्पष्टीकरण करा.

१२)रिकार्डोच्या मूल्य सिद्धांताचे टीकात्मक स्पष्टीकरण करा.

१३)रिकार्डोच्या खंड सिद्धांताचे टीकात्मक स्पष्टीकरण करा.

१४)रिकार्डोचा आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सिद्धांत स्पष्ट करा.

१५)माल्थसच्या लोकसंख्येच्या सिद्धांताचे स्पष्टीकरण करा.

१६)आर्थिक आरिष्ट याबाबतीतले माल्थसचे विचार स्पष्ट करा.

१७)मार्क्सने मांडलेल्या श्रममुल्य सिद्धांताचे टीकात्मक परीक्षण करा.

१८)भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील आरिष्टविषयकचा मार्क्सचा सिद्धांत स्पष्ट करा.

१९)फ्रेडरिक लिस्टने सनातन संप्रदायावर केलेल्या टीकेचे मूल्यमापन करा.

२०)लिस्टच्या उत्क्रांतीविषयक सिद्धांताचे स्पष्टीकरण करा.

२१)लिस्टच्या संरक्षणनीतीचे मूल्यमापन करा.

२२)लिस्टच्या संरक्षणनीतीची महत्वाची वैशिष्ट्ये विशद करा.

२३)निसर्गवाद म्हणजे काय? त्यांचे प्रमुख घटक स्पष्ट करा.

२४)परकीय व्यापाराचे व्यापारवादातील महत्व स्पष्ट करा.

प्र. ३ थोडक्यात उत्तरे लिहा.

१) कवेस्नेचा तक्ता स्पष्ट करा.

२) निसर्गवाद व करआकारणी स्पष्ट करा.

३) ॲडम स्मिथच्या कर कसोट्या विशद करा.

४) स्मिथचे निर्हस्तक्षेपाचे धोरण स्पष्ट करा.

५) स्मिथचे भांडवलविषयक विचार सांगा.

६) ॲडम स्मिथचे सार्वजनिक आयव्ययाबाबतचे विचार सांगा.

७) ॲडम स्मिथचा उदारमतवाद स्पष्ट करा.

८) ॲडम स्मिथचा निसर्गवाद स्पष्ट करा.

९) ॲडम स्मिथचे आशावादा बाबतचे विचार विशद करा.

१०) रिकार्डोचा खंड सिद्धांत स्पष्ट करा.

११) रिकार्डोच्या खंड सिद्धांतावरील टीकात्मक परीक्षण करा.

१२) रिकार्डोचा वेतन सिद्धांत स्पष्ट करा.

१३) रिकार्डोचे नफाविषयक विचार सांगा.

१४) रिकार्डोचे आंतरराष्ट्रीय व्यापारविषयक विचार स्पष्ट करा.

१५) रिकार्डोचे करविषयक विचार स्पष्ट करा.

१६) मार्क्सचा उल्लेख समाजवाद्यांचा कुलगुरू असा का केला जातो?

१७) मार्क्सने मांडलेलाऐतिहासिक भौतिकवाद स्पष्ट करा.

१८) मार्क्सची विरोध विकासाधिष्टीत भौतिकवाद ही संकल्पना सांगा.

१९) मार्क्सने सांगितलेले संचित श्रम कसे असते.

२०) श्रमाचे मापन करताना कोणत्या अडचणी येतात

२१) अतिरिक्त मूल्याची निर्मिती कशी होते.

२२) अतिरिक्त मूल्याचे सूत्र सांगा.

२३) उपयोगिता मूल्य व विनिमय मूल्य विशद करा.

२४) मार्क्सने सांगितलेला प्राथमिक साम्यवाद स्पष्ट करा.

२५) वस्तू-पैसा-वस्तू (C-M-C) विनिमयाचा प्रकार स्पष्ट करा.

२६) अतिरिक्त मूल्य कोणत्या विनिमय प्रकारात निर्माण होत नाही? आणि कसे?

२७) स्थिर आणि बदलत्या भांडवलातील फरक भांडवलशाहीत भांडवलवृद्धी कशी दिली जाते?

२८) नफ्याचा दर व अतिरिक्त मूल्याचा दर यांचे सूत्र द्या.

२९) मार्क्सने सांगितलेली राखीव कामगार दल संकल्पना स्पष्ट करा.

३०) तेजी-मंदी चक्रे कोणत्या अर्थव्यवस्थेत निर्माण होतात?

३१) भांडवलशाहीत अर्थव्यवस्थेत होणारे उत्पादन हे अनियोजित असते असे का म्हटले जाते?

३२) कामगार क्रांती कोणत्या कारणामुळे घडून येईल असे मार्क्सना वाटते?

३३) मार्क्सने सांगितलेली शासन व शोषणविरहीत समाजाची संकल्पना स्पष्ट करा.

३४) लिस्टची राष्टवादी विचारसरणी विशद करा.

३५) लिस्टचे संरक्षणविषयक तत्वज्ञान सांगा.

३६) लिस्टच्या आर्थिक विकासाच्या अवस्था सांगा.

**रयत शिक्षण संस्थेचे,**

# डी.पी. भोसले कॉलेज,कोरेगाव

## अर्थशास्त्र विभाग

## प्रश्न संच

## बी.ए.भाग III

### अर्थशास्त्रातील संशोधन पद्धती

**प्र.१ योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१) -------- यांनी संशोधनाची उत्तम व्याख्या केली आहे.

अ.प्रा.रॉबिन्सन ब.ॲडम स्मिथ क. पी.व्ही.यंग ड. रिकार्डो

२)अर्थशात्र हे --------- शास्त्र आहे.

अ.नैसर्गिक ब. सामाजिक क भौतिक ड. व्यावहारिक

३)संशोधनात समस्याचा ----------- अभ्यास केला जातो.

अ.सुक्ष्म ब. आंशिक क. व्यापक ड भ्रामक

४)उपयोजित संशोधनास ---------- असेही म्हणतात

अ.वर्णनात्मक ब. अन्वेषणात्मक क. कार्यात्मक ड. शुद्ध

५)शुद्ध संशोधन -------- या नावानेही ओळखले जाते.

अ. वर्णनात्मक ब. मूलभूत क. गुणात्मक ड. संख्यात्मक

६) संशोधन आराखड्याची व्याख्या --------- यांनी केली आहे

अ. ॲडम स्मिथ ब. रिकार्डो क. माल्थस ड. वरीलपैकी नाही

७) संशोधन आराखड्यात ----- अत्यंत महत्वाचे असते.

अ.आकडेवारी ब.नियोजन क.तंत्र ड.प्रक्रिया

८) संशोधन आराखडा म्हणजे संशोधनाची -------- असते.

अ. प्रक्रिया ब.रूपरेषा क.तत्वप्रणाली ड.निष्कर्ष प्रक्रिया

९) संशोधन समस्येच्या संपूर्ण रूपरेषेमधून -------- तयार होतो.

अ.आदर्श आराखडा ब.संशोधनाचा आत्मा क.मास्टर प्लान ड.संशोधक

१०) नियमित अवस्थेत केलेले निरीक्षण म्हणजे ------ होय.

अ. संशोधन ब.प्रयोग क. सहभागी निरीक्षण ड.अ सहभागी निरीक्षण

११)एखादी घटना घडण्यास कारणीभूत असणाऱ्या घटकांचा शोध घेण्याच्या हेतूने तयार करण्यात आलेल्या संशोधन आराखड्यास -------असे म्हणतात.

अ.अन्वेषणात्मक ब. वर्णनात्मक क.विधानात्मक ड.परीक्षणात्मक

१२) ------- हे संशोधनाचे उदिष्ट आहे.

अ.समस्येचा परिचय करून देणे ब.वर्तन करणे.क.निदान करणे.ड.वरील सर्व

१३) -------- हे संशोधनाचे प्रकार होत.

अ. वर्तनात्मक ब. स्पष्टीकरणात्मक क.उपयोजित ड.वरील सर्व

१४) ज्या संशोधनातील माहिती ही संख्येत मोजता येते त्याला -------संशोधन म्हणतात.

अ. गुणात्मक ब. संख्यात्मक क.वर्णनात्मक ड.ऐतिहासिक

१५) निर्जीव,अचल अशा वस्तूचा अभ्यास करणारे संशोधन म्हणजे भौतिक संशोधन होय.

अ. सामाजिक संशोधन ब.शास्त्रीय संशोधन क. भौतिक संशोधन ड.संख्यात्मक संशोधन

१६) -------- चांगल्या संशोधनाचे महत्व होय.

अ. अज्ञानाचा विनाश ब.तर्कशुद्ध विचारांची सवय क.नियोजनाचे सहाय्य ड.वरील सर्व

१७) संशोधन समस्येतील मतभिन्नता दूर करण्यासाठी संबंधित समस्येचे योग्य उत्तर शोधून काढण्यासाठी आखलेली योजना किंवा व्यूहरचना म्हणजे ----------- होय.

अ. संशोधनाची गृहिते ब. संशोधन कार्याची तथ्ये क. संशोधन आराखडा ड.सिद्धांत

१८) -------- ही संशोधन आराखडयाची पायरी होय.

अ.समस्येची निवड ब.चलाची ओळख क.परिणांमाचे निरीक्षण ड. वरील सर्व

१९) ज्या विधानाची सत्यासत्यता पडताळून पहावयाची आहे व पाहणे शक्य आहे त्या विधानास गृहीतक म्हणतात.ही व्याख्या -------- यांनी दिली आहे.

अ. पी.व्ही.यंग ब.गुड व हॅट क.लुंडबर्ग ड.इ.एस.बोगार्डस

२०) नेहमी अनुभवाला येणाऱ्या घटनांमधून मिळणाऱ्या गृहितकांना ------- म्हणतात.

अ. अनुभवनिष्ठ एकविधतेबाबतची ब.आदर्शरुपाबाबतची क.संशोधनात्मक ड.सांख्यिकीय

२१) संशोधनात्मक गृहितके, शून्य गृहितक आणि सांख्यिकीय गृहितक हे तीन प्रकार ------- यांनी सांगितलेले आहेत.

अ.ब्लक आणि चॉम्पियन ब.गुड आणि हॅट क.कोहेन व नगेल ड. इ.एस.बोगार्डस

२२) मुख्य सिद्धांतातील तत्व खोडून काढणे हा ------ गृहितकाचा हेतू असतो.

अ.शून्य ब. सांख्यिकीय क.कामचलाऊ ड.वैज्ञानिक

२३) संशोधनाला  दिशा दाखविण्याचे कार्य ------ करतात.

अ.तत्वे    ब. सिद्धांत    क.तथ्य    ड.अध्ययन

२४) -------- मुळे मूळ सिद्धांतातील त्रुटी दूर होतात.

अ. गृहितक   ब.आराखडा   क.तथ्य    ड. गृहितक

२५) संशोधन समस्येशी संबंधित माहिती संशोधन कर्त्याने स्वत:जमा केली असेल तर त्याला ------ तथ्ये असे म्हणतात.

अ. प्राथमिक  ब.दुय्यम  क.तृतीयक   ड. वरीलपैकी नाही

२६) तथ्य हे अनुभवसिद्ध पडताळणी घेण्यायोग्य निरीक्षण असते असे  ----- यांनी म्हटले आहे.

अ. पी.व्ही.यंग  ब.गुड व हॅट  क.कोहेन  ड. इ.एस.बोगार्डस

२७) प्राथमिक तथ्यात ------ हा गुणधर्म आढळतो.

अ. विश्वसनीयता  ब. आत्मनिष्ठता   क.वास्तवता   ड.वरील सर्व

२८) संशोधकाने  इतर व्यक्तीनी जमा केलेली सामग्री संशोधनासाठी वापरली असेल तर तिला ------ म्हणतात.

अ.प्राथमिक सामग्री ब.दुय्यम सामग्री क.तृतीयक सामग्री ड.यापैकी नाही

२९)विशेष हेतूने जिज्ञासू वृत्तीने जाणीवपूर्वक घडणाऱ्या घटनांकडे  पाहणे म्हणजे ------- होय.

अ.निरीक्षण   ब. मुलाखत  क.संकल्पना   ड.तथ्य संकलन

३०)------- यांच्या मते शास्त्राचा प्रारंभ निरीक्षणातून झाला.

अ.गुड आणि हॅट  ब.डॉ. मार्शल  क.डॉ.हिक्स   ड.सी.ए.मोसर

३१)-------  यांनी निरीक्षणाची केलेली व्याख्या लोकप्रिय आहे.

अ.रॉबिन्सन  ब.मार्शल  क.पी.व्ही.यंग.   ड.चपेल

३२) ------ यांचा सिद्धांत निरीक्षण तंत्राचे उदा.आहे.

अ.ग्रेशमचा सिद्धांत ब.आर्कीमिडीजचा सिद्धांत क.न्युटनचा सिद्धांत  ड.वरील सर्व

३३) ----- यांनी सहभागी निरीक्षणाला विशेष महत्व दिले आहे.

अ.प्रा.एडवर्ड लिंडमन ब.डॉ.मार्शल क.प्रा.हिक्स ड.गुड आणि हॅट

३४)विशिष्ट  समस्येचा अभ्यास करण्यासाठी संबंधीताकडून त्या समस्येबाबत  माहिती मिळविण्याच्या हेतूने तयार केलेल्या प्रश्नांच्या मालिकेस ------- असे म्हणतात.

अ.मुलाखत  ब.प्रश्नावली  क. सर्वेक्षण   ड.यापैकी नाही

३५) -------- हे प्रश्नावलीचे प्रमुख वैशिष्ट्य होय.

अ.लिखित प्रश्न  ब.लिखित उत्तर  क.गोपनीयता  ड.वरील सर्व

३६) प्रश्नावली तंत्रात ------- हा फायदा मिळतो.

अ.वेळ,श्रम,पैसा यांची बचत  ब.निरक्षरांना उपयोग क.कमी प्रतिसाद ड. वरील सर्व

३७) ज्या प्रश्नावलीत प्रश्नांचे स्वरूप नियोजित,सुस्पष्ट व निश्चित असते तिला ----- म्हणतात.

अ. संरचित प्रश्नावली ब.अ असंरचित प्रश्नावली क.बंदिस्त प्रश्नावली ड.मुक्त प्रश्नावली

३८) ज्या प्रश्नावलीत प्रत्येक प्रश्नासमोर त्यांची संभाव्य उत्तरे दिलेली असतात तिला ------- प्रश्नावली म्हणतात.

अ. असंरचित प्रश्नावली ब. बंदिस्त प्रश्नावली क. मुक्त प्रश्नावली ड.यापैकी नाही

३९)ज्या प्रश्नावलीत उत्तरदात्याला उत्तरे लिहिण्याचे पूर्ण स्वातंत्र्य दिलेले असते तिला ------ प्रश्नावली असे म्हणतात.

अ. मुक्त प्रश्नावली ब. बंदिस्त प्रश्नावली क.मिश्र प्रश्नावली ड.टपालद्वारा

४०) प्रश्नकर्ता व उत्तरदाता या दोन व्यक्तीमधील प्रत्यक्ष संवाद म्हणजे ------- होय.

अ. प्रश्नावली ब. मुलाखत क. सर्वेक्षण ड.दुय्यम सामग्री

**प्र.२ दीर्घोतरी प्रश्न लिहा.**

१) अर्थशास्त्रीय संशोधनाची व्याख्या सांगून तिची उदिष्टे स्पष्ट करा.

२) अर्थशास्त्रीय संशोधनाची व्याप्ती व स्वरूप याची चर्चा करा.

३) संशोधनाचा अर्थ सांगून त्याची उदिष्टे स्पष्ट करा.

४) संशोधनाच्या विविध प्रकारांची चर्चा करा.

५) संशोधनाची व्याख्या द्या व त्याचे महत्व सांगा.

६) संशोधन आराखड्याचा अर्थ सांगून त्याची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

७) संशोधन आराखड्यातील विविध पायऱ्याची चर्चा करा.

८) चांगल्या संशोधन आराखड्याची वैशिष्ट्ये विशद करा.

९) संशोधन आराखड्याची गरज स्पष्ट करा.

१०)गृहीतक म्हणजे काय हे सांगून गृहीतकांची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

११)गृहीतकाची व्याख्या द्या. गृहीतकाचे प्रकार कोणते?

१२) गृहीतकाचा अर्थ सांगून गृहीतकाचे महत्व स्पष्ट करा.

१३) संकल्पना म्हणजे काय? संकल्पना समजावून घेताना येणाऱ्या समस्या सांगा.

१४) संकल्पनेची आकरिक व्याख्या आणि क्रियाशील व्याख्या म्हणजे काय?

१५) तथ्य संकलन म्हणजे काय? हे सांगून प्राथमिक तथ्याचे गुण-दोष सांगा.

१६) तथ्य संकलनाची व्याख्या द्या. तथ्याची वैशिष्ट्ये कोणती?

१७) निरीक्षण म्हणजे काय? त्याचे स्वरूप व वैशिष्ट्ये यांची माहिती द्या.

१८) अनियंत्रित निरीक्षण म्हणजे काय? त्यांच्या गुण-दोषांचे वर्णन करा.

१९) निरीक्षणाची व्याख्या सांगून विविध प्रकारांची माहिती द्या.

२०) प्रश्नावलीचा अर्थ सांगून तिची वैशिष्ट्ये सांगा.

२१) प्रश्नावली पद्धतीच्या गुण-दोषाची चर्चा करा.

२२) प्रश्नावलीचे विविध प्रकार विशद करा.

२३) प्रश्नावली रचनेच्या तंत्राची चर्चा करा.

२४) प्रश्नावलीचा अर्थ सांगून चांगल्या प्रश्नावलीची लक्षणे सांगा.

२५) मुलाखत पद्धतीचा अर्थ सांगून तिची वैशिष्ट्ये सांगा.

२६) मुलाखत पद्धतीचे गुण-दोष सविस्तर सांगा.

२७) मुलाखतीचे विविध प्रकार विशद करा.

२८) व्यक्तिगत व सामुहिक मुलाखत म्हणजे काय? ते सांगून त्यांचे गुण-दोष सांगा.

२९) दुय्यम सामग्री म्हणजे काय? त्याच्या विविध स्तोत्रांची चर्चा करा.

३०) व्यक्तिगत दस्तऐवजांच्या विविध प्रकारांची चर्चा करा.

३१) सार्वजनिक प्रलेख म्हणजे काय? त्यांचे विविध प्रकार स्पष्ट करा.

३२) दुय्यम सामग्री म्हणजे काय? त्यांची उपयोगिता व महत्व सांगा.

**प्र. ३.थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) संशोधनाची उदिष्टे स्पष्ट करा.

२) चांगल्या संशोधनाची गुणवत्ता सांगा.

३) संशोधनाच्या विविध प्रकारांची चर्चा करा.

४) अर्थशास्त्रीय संशोधनाची व्याप्ती सांगा.

५) संशोधन आराखड्याचे महत्व सांगा.

६) चांगल्या संशोधन आराखड्याची वैशिष्ट्ये विशद करा.

७) गृहीतकांची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

८) गृहीतकाचे प्रकार स्पष्ट करा.

९) गृहीतकाचे महत्व स्पष्ट करा.

१०) मुलाखत व प्रश्नावली यातील फरक विशद करा.

११) मुक्त प्रश्नावलीच्या गुण-दोषाची चर्चा करा.

१२)प्रश्नावली पद्धतीचे फायदे सांगा.

१३)मुलाखत पद्धतीचे फायदे सांगा.

१४) मुलाखतीचे उद्दिष्टानुसार वर्ग्रीकरण स्पष्ट करा.

१५) संरचित मुलाखतीचे गुण-दोष स्पष्ट करा.

१६) दुय्यम तथ्य संकलनात घ्यावयाची दक्षता स्पष्ट करा.

१७) प्राथमिक व दुय्यम तथ्य यामधील फरकाची चर्चा करा.

१८) दुय्यम तथ्य संकलनाचे महत्व सांगा.

१९) आत्मचरित्रांचे गुण-दोष विशद करा.

२०) तथ्य संकलनाचे महत्व सांगा.

२१) वर्णनात्मक संशोधन पद्धती स्पष्ट करा.

२२) संकल्पनेची वैशिष्ट्ये विशद करा.

२३) सहभागी व असहभागी निरीक्षणाचे गुण-दोष सांगा.

२४) बंदिस्त प्रश्नावलीचे गुण-दोष स्पष्ट करा.

२५) व्यक्तिगत मुलाखतीचे गुण-दोष स्पष्ट करा.

**रयत शिक्षण संस्थेचे,**

# डी कोरेगाव,कॉलेज भोसले .पी.

## अर्थशास्त्र विभाग

## प्रश्न संच

## बी.ए. III

## आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र

**प्र.१.योग्य तो पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.**

१)गॅटची स्थापना --------- मध्ये झाली.

अ.इ.स.१९४२ ब.इ.स.१९४७ क.इ.स.१९५० ड.इ.स.१९५६

२) देशाच्या भौगोलिक सीमा ओलांडून जो व्यापार होतो त्याला ------- म्हणतात.

अ.देशांतर्गत व्यापार ब.विदेशी व्यापार क.विभागीय व्यापार ड.यापैकी नाही.

३) जागतिक बॅंक -------- हे कार्य करते.

अ.पुनर्रचनेसाठी मदत ब.ठेवी स्वीकारणे क.कर्ज देणे ड.पतनिर्मिती करणे

४) अन्योन्य मागणीची तत्व -------- यांनी मांडले आहे.

अ.डॉ. मार्शल ब.जे.एस मिल क.मिसेस जोन रॉबिन्सन ड.प्रा.पिगु

५) आधुनिक आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सिद्धांत------- मांडला.

अ. डॉ. मार्शल ब. रिकार्डो क.जे.बी.से ड. हेक्श्चर – ओव्हलिन

६) एकाच देशाच्या दोन राज्यामध्ये अथवा विभागामध्ये होणारा व्यापार म्हणजे -------- होय.

अ. आंतर –विभागीय व्यापार ब. आंतरराष्ट्रीय व्यापार क. वस्तू व्यापार ड. यापैकी नाही.

७) देशाच्या सीमेपलीकडच्या विविध देशात होणारा व्यापार म्हणजे ------ होय.

अ. आंतरराष्ट्रीय व्यापार ब.विदेशी व्यापार क.आयात-निर्यात व्यापार ड.वरील सर्व

८) अंतर्गत व्यापार व आंतरराष्ट्रीय व्यापार हा ------- वर आधरित आहे.

अ.श्रमविभागणी ब.कामगारांची कार्यक्षमता क.उत्पादन प्रमाणवर ड. यापैकी नाही.

९) अंतर्गत व्यापार व आंतरराष्ट्रीय व्यापार या दोहोंचा हेतू ------- असतो.

अ.प्रंचड उत्पादन ब.नफा मिळविणे क.आर्थिक सहकार्य वाढविणे ड.गतिक्षमता वाढविणे

१०) आंतरराष्ट्रीय व्यापाराचा तौलनिक उत्पादन खर्चाचा सिद्धांत ------- यांनी मांडला.

अ.जे.के.मेहता ब.हॅबलर क.रिकार्डो ड.जे.आर.हिक्स

११) हेक्श्चर – ओव्हलिन यांच्या सिद्धांताला ------- असेही म्हणतात.

अ.घटक सुबत्तेचा सिद्धांत ब.खंड सिद्धांत क.घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांत ड.मूल्य सिद्धांत

१२) रिकार्डोने तौलनिक उत्पादन खर्च सिद्धांत मांडताना --------- सिद्धांताचा आधार घेतला आहे.

अ.श्रम-मूल्य  ब.घटते उत्पादन फल क.खंड ड. यापैकी नाही.

१३) हेक्श्चर – ओव्हलिन यांच्या सिद्धांताला ------- असेही म्हणतात.

अ.आधुनिक सिद्धांत ब. व्यापारशर्तीचा सिद्धांत क.मूल्य सिद्धांत ड.वरील सर्व

१२) आंतरराष्ट्रीय व्यापारापासून मिळणारा लाभ हा निरपेक्ष खर्चाने अस्तित्वात येतो असे मत ------ यांनी मांडले आहे.

अ.ॲडम स्मिथ ब. हॅबलर  क.जे.एस.मिल.    ड.केरेन क्रॉस

१३) -------- यांनी आंतरराष्ट्रीय व्यापारापासून मिळणाऱ्या लाभाचे मापन करण्याच्या पद्धती वापरल्या आहेत.

अ.जेकोब विनर ब. ॲडम स्मिथ क. हॅबलर ड. हेक्श्चर – ओव्हलिन

१४) -------- यांनी अन्योन्य मागणीचे तत्व मांडले आहे.

अ.रिकार्डो ब.जे.एस.मिल. क. हॅबलर ड. हेक्श्चर – ओव्हलिन

१५) -------- यांनी प्रस्ताव वक्राची संकल्पना मांडली आहे.

अ.मार्शल-एजवर्थ ब.जे.बी.से. क.माल्थस ड.रिकार्डो

१६) ज्या विनिमय दराने दोन देशांत वस्तूंची आयात-निर्यात होते त्या दराला ------- म्हणतात.

अ. किंमत ब. व्यापारशर्ती क.एक्स्चेज रेट ड.नफा.

१७) आंतरराष्ट्रीय व्यापारातील लाभाचे वाटप कसे होते हे ------- च्या सहाय्याने स्पष्ट होते.

अ. व्यापारशर्ती ब.कोटा क.जकाती ड. यापैकी नाही.

१८) निर्यात वस्तूच्या किमतीच्या मानाने आयात वस्तूच्या किंमती कमी असतील तर त्याला ------- व्यापारशर्ती म्हणतात.

अ.अनुकूल ब.प्रतिकूल क. निव्वळ वस्तुगत ड.स्थूल वस्तुगत

१९) उत्पन्नगत व्यापारशर्ती संकल्पना ------- यांनी मांडली आहे.

अ.प्रा.जी.एस.डोरान्स ब.प्रा.रिकार्डो क.टौसिंग व विनर ड.डॉ.मार्शल

२०) ------- हा व्यापारशर्तीवर परिणाम करणारा महत्वाचा घटक होय.

अ.मागणीची लवचिकता ब.पुरवठ्याची लवचिकता क.उत्पादनाची रचना ड.वरील सर्व

२१)एका देशाच्या चलनाची दुसऱ्या देशाच्या चलनातील किंमत म्हणजे ------- होय.

अ.किमत ब.विनिमय दर क.खंड ड.मजुरी

२२)एखाद्या देशाने विशिष्ट हेतूने अन्य देशातील चलनाचे कायदेशीर मूल्य कमी करणे म्हणजे ------- होय.

अ.चलनमूल्य घट ब. अवमूल्यन क.चलनऊध्व मूल्य ड.चलनमूल्य स्थैय

२३)क्रयशक्ती समता सिद्धांताची मांडणी ------- या अर्थशास्त्रज्ञाने केली आहे.

अ.गुस्ताव्ह कॅसल ब.मार्शल क.रॉबटसन ड.स्कॅमेल

२४) सुवर्ण आयात बिंदू आणि सुवर्ण निर्यात बिंदूनी हुंडणावळ दर ------- राहत असे.

अ.स्थिर ब.अस्थिर क.बदलते ड.तरते

२५)मर्यादित बदलणाऱ्या विनिमय दरावर -------- बॅंकेचे नियंत्रण असते.

अ.स्टेट बॅंक आफ इंडिया ब.मध्यवर्ती बॅंक क.जागतिक बॅंक ड.आयात-निर्यात बॅंक

२६)मुक्त व्यापार नीतीचा पुरस्कार ---------- या अर्थशात्रज्ञाने केला.

अ.फ्रेडरिक लिस्ट ब.ॲडम स्मिथ क.प्रा.हॅबलर ड.अलेक्झांडर हॅमिल्टन

२७) संरक्षण व्यापार धोरणाचा पुरस्कार -------- यांनी केला.

अ. फ्रेडरिक लिस्ट ब.ॲडम स्मिथ क.प्रा लिप्से ड.ओव्हीन

२८)-------- या अर्थशात्रज्ञाने भौगोलिक श्रमविभागणीला महत्व दिले.

अ.प्रा.सॅम्युलसन ब.प्रा. हॅबलर क.किंडल बर्जर ड.वरीलपैकी सर्व

२९)-------- या अर्थशात्रज्ञाने शेतीच्या संरक्षणाचा मुद्दा मांडला.

अ. ॲडम स्मिथ ब. प्रा.हॅबलर क. रिकार्डो ड.माल्थस

३०) जकाती आणि कोटा पद्धती या ------- व्यापार नीतीत वापरल्या जाणाऱ्या पद्धती होत.

अ.मुक्त ब.संरक्षित क.मिश्र ड. वरीलपैकी नाही.

३१)------- यांनी जकातीबाबतचे सविस्तर विवेचन केले आहे.

अ.एजवर्थ ब. ॲडम स्मिथ क. प्रा.हॅबलर ड.भगवती

३२)वस्तूची नगसंख्या मोजण्यासाठी त्या परिमाणावरून आकारलेल्या जकाती म्हणजे ----- होय.

अ. मुल्यानुसार जकाती ब. परिमाणानुसार जकाती क.संयुक्त जकाती ड.एक स्तंभी जकाती

३३)--------- यांनी जकातीचे परिणाम स्पष्ट केले आहेत.

अ.किंडल बर्जर ब.हॅम क.जे.एस.मिल. ड.रिकार्डो

**प्र २.दीर्घोत्तरी प्रश्न.**

१) आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राच्या अभ्यासाचा आढावा घ्या.

२) आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राचा अभ्यास कोणत्या दृष्टीने महत्वाचा ठरतो याची चर्चा करा.

३) आंतर –विभागीय व्यापार व आंतरराष्ट्रीय व्यापार या दोहोमधील साम्य व भेद स्पष्ट करा.

४) आंतरराष्ट्रीय व्यापार हा आंतर –विभागीय व्यापाराचाच एक विशेष प्रकार आहे.या विधानाची चर्चा करा.

५) आंतर –विभागीय व्यापार व आंतरराष्ट्रीय व्यापार यामधील मुलभूत फरक स्पष्ट करा.

६) आंतरराष्ट्रीय व्यापारविषयक तुलनात्मक उत्पादन खर्चाचा सिद्धांत मांडून तो विशद करा.

७) रिकार्डोच्या तौलनिक उत्पादन खर्च सिद्धांताचे टीकात्मक परीक्षण करा.

८) हेक्श्चर – ओव्हलिन सिद्धांताची चर्चा करा.

९) व्यापारापासून लाभ म्हणजे काय? त्याच्या मापनाच्या विविध पद्धती सांगा.

१०) व्यापारापासून लाभ निर्धारित करणाऱ्या विविध घटकाची चर्चा करा.

११) व्यापार आर्थिक वृद्धीचे इंजिन आहे यावर भाष्य करा.

१२) व्यापारशर्ती म्हणजे काय? त्याचे विविध प्रकार स्पष्ट करा.

१३) अन्योन्य मागणीची तत्वप्रणाली सांगून तिचे महत्व व मर्यादा विशद करा.

१४) विनिमय दर म्हणजे काय? हे सांगून स्थिर विनिमय दराच्या गुण-दोषांची चर्चा करा.

१५) बदलते विनिमय दर म्हणजे काय? हे सांगून बदलत्या विनिमय दराच्या गुण-दोषांची चर्चा करा.

१६) तरत्या विनिमय दराच्या गुण-दोषांची चर्चा करा.

१७) मुक्त व्यापारनीती म्हणजे काय? त्याचे तुम्ही कसे समर्थन कराल?

१८) मुक्त व्यापाराच्या विरोधी कोणते मुद्दे मांडले जातात.?

१९) संरक्षण धोरणाचे तुम्ही कसे समर्थन कराल?

२०) संरक्षण धोरणाला विरोध करणाऱ्या मुद्द्यांची चर्चा करा.

२१) आयात –निर्यात जकातीची उदिष्टे कोणती हे सांगून त्याचे परिणाम स्पष्ट करा.

२२) आयात कोटा पद्धती म्हणजे काय? तिचे विविध प्रकार सांगा.

२३) कोटा पद्धतीचे परिणाम स्पष्ट करा.

**प्र.३ थोडक्यात उत्तरे द्या.**

१) आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राच्या अभ्यासाचे महत्व सांगा.

२) आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राचा अभ्यासाच कोणत्या दृष्टीने महत्वाचा असतो?

३) व्यापारापासून लाभाचे मापन करण्याचा आधुनिक दृष्टीकोन सांगा.

४) व्यापारापासून लाभ व उत्पन्न वितरण संकल्पना स्पष्ट करा.

५) व्यापारशर्तीचे विविध प्रकार सांगा.

६) अन्योन्य मागणीची तत्वाचे टीकात्मक परीक्षण करा.

७) व्यापारशर्तीवर परिणाम करणाऱ्या घटकाची चर्चा करा.

८) स्थिर विनिमय दर धोरणाचे फायदे सांगा.

९) बदलत्या विनिमय दराचे तोटे सांगा.

१०)तरत्या विनिमय दराच्या फायद्या- तोट्यांचा आढावा घ्या.

११)मुक्त व्यापार धोरणाचे समर्थन कसे कराल.

१२)संरक्षण व्यापार धोरणाचा पुरस्कार का केला जातो.

१३)जकातीचे प्रमुख प्रकार स्पष्ट करा.

१४)जकातीचे परिणाम सांगा.

१५)कोटा पद्धतीचे उद्देश कोणते?

१६)आयात कोटा पद्धतीचे प्रमुख प्रकार स्पष्ट करा.

१७)आयात परवाना पद्धतीचे प्रकार कोणते?